प्रभात

# चोरीला गेलेले मोबाइल मिळाले थेट घरपोच!

## पुणे रेल्वे पोलिसांच्या मोबाइल मिशन मोहिमेने नागरिक भारावले

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८ -** पुणे रेल्वे स्थानकावर दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. गर्दीच्या प्लॅटफॉर्मवर, गाड्यांमधील धक्काबुक्कीत किंवा प्रवासादरम्यान अनेकांचे मोबाइल चोरीला जातात. मोबाइल गेला म्हणजे तो कायमचाच गेला, अशीच बहुतांश प्रवाशांची समजूत असते. मात्र, पुणे रेल्वे पोलिसांनी ही समजूत खोटी ठरवत तब्बल ४१० चोरीचे मोबाइल शोधून त्यांच्या मूळ मालकांपर्यंत पोहोचवण्याची किमया करून दाखवली आहे.

पुणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात (जीआरपी) देशभरातील ४१० प्रवाशांनी मोबाइल चोरीच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यांची एकूण किंमत तब्बल ९० लाख रुपये इतकी आहे. विशेष म्हणजे हे तक्रारदार केवळ पुणे किंवा महाराष्ट्रातील नव्हते. जम्मू-काश्मीरपासून केरळपर्यंत, आसाम, गुजरात, मध्य प्रदेशासह देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रवासी यात होते.



(एआय छायाचित्र)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद खोपिकर यांनी सांगितले, की, अनेक प्रवाशांनी मोबाइल मिळण्याची अपेक्षाच सोडून दिली होती. मात्र, आमच्या पथकाने तांत्रिक तपास, आयएमईआय ट्रॅकिंग, स्थानिक माहिती आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून आरोपींना अटक केली आणि चोरीचे मोबाइल जप्त केले. या प्रकरणातील अनेक तक्रारदार देशाच्या वेगवेगळ्या भागांत राहात असल्याने त्यांना पुण्यात बोलावून त्रास न देता, पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः रेल्वेने प्रवास करत हे मोबाइल थेट त्यांच्या घरी पोहोचवले. आमचे पोलीस कर्मचारी मोबाइल घेऊन संबंधितांच्या घरी गेले. अनेकांना विश्वासच बसत नव्हता, की चोरीला गेलेला पोलीस स्वतः घरी आणून देतील. काही प्रवाशांनी मोबाइल परत मिळाल्यानंतर पोलिसांचे डोळ्यांत पाणी आणणाऱ्या शब्दांत आभार मानले. अनेक मोबाइलमध्ये कुटुंबीयांचे फोटो, महत्त्वाची कागदपत्रे आणि आठवणी जपलेल्या होत्या.

### सर्वत्र चर्चेचा विषय

दरम्यान, पुणे रेल्वे स्थानकावर सापडलेले आणि अजूनही मालकांचा शोध सुरू असलेले एक हजारांहून अधिक मोबाइल लोहमार्ग पोलिसांकडे असल्याची माहितीही पोलिसांनी दिली आहे. या मोबाइलच्या मालकांचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू असून, गुन्हे उघडकीस आणण्याबरोबरच हरवलेली माणुसकी परत मिळवून देणारी ही पुणे रेल्वे पोलिसांची मोहीम सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.